PUBLICATION – KESARI
DATE – NOVEMBER 7, 2014
PAGE NO. – 2

# 'सीप' जोडणार औद्योगिक पुण्याला

पुणे : गेल्या तीन वर्षांतील यशानंतर आणि मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर 'पुणे कनेक्ट २०१४'चे यंदा पुन्हा आयोजन करण्यात येत आहे. विविध क्षेत्रातील कंपन्यांना एकत्र आणणाऱ्या या अभिनव उपक्रमाच्या निमित्ताने हायटेक पुणे आणि उदयोन्मुख कंपन्यांचा एकत्रित मिलाफ याठिकाणी पाहावयास मिळणार आहे. उद्या शनिवारी हॉटेल वेस्टिंन, पुणे येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

'सॉफ्टवेअर एक्स्पोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणे'ने (एसइएपी- 'सीप') २०११ मध्ये या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची सुरूवात केली. पुण्यातील उदयोन्मुख कंपन्यांना मदतीचा हात देण्याबरोबरच आता सॉफ्टवेअर, बीपीओ, मॅन्युफॅक्चरिंग आणि इंजिनिअरिंग या क्षेत्रांत कार्यरत असलेल्या सर्व उद्योगांचे येथे स्वागत केले जाणार असून, त्यांना एकत्र आणून प्रगती साधण्यासाठी मदत केली जाणार आहे.

अशा प्रकारच्या या अभिनव उपक्रमाला नॅस्कॉम, टीआयई पुणे, एसटीपीआय, एमसीसीआयए, पुणे टेक, हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन (एचआयए) आणि पुणे ओपन कॉफी क्लब (पीओसीसी) यांनी सहकार्याचे पाठबळ दिले आहे.